RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना - NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.



अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्मिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ४२ वे
अंक ६ वा
१० जून २०२१
किंमत १ रूपया

## "श्री परशुराम जयंती पूजन"



"श्री परशुराम जयंती पूजन करतांना
श्री. अनिरूद्ध अभ्यंकर"

# संस्थेतर्फे आवाहन

कोरोनाच्या जागतिक प्रादुर्भावामुळे आपल्याला अनेक प्रियजनांना मुकावे लागले आहे. अनेकांचे मातृ-पितृ छत्र हरपले आहे. घरातल्या कर्त्या मंडळींबरोबरच काही जणांची कुटुंबेच्या कुटुंबे उध्वस्त झाली आहेत, विस्कळीत झाली आहेत. रोजगार -धंद्याचेही अतोनात नुकसान झाले आहे. दैनंदिन जीवन जगण्याचाही प्रश्न अनेकांपुढे ठाकला आहे. त्याचबरोबर संकटही अजून पूर्णपणे संपलेले नाही आणि सध्या तरी पैलतीर धूसरच दिसत आहे.

मात्र, आज न् उद्या हे संकट संपणार आहे. जनजीवन सामान्य, सुरळीत व नियमित पूर्वपदावर येईल. ती सुप्रभात नक्की उगवेल. आम्हाला खात्री आहे की आपल्या गुणसुत्राच्या गुणधर्माप्रमाणे आपण या संकटावरही मात करून नव्याने उभारी घेऊन पुढे दमदार वाटचाल करू. आपली संस्था ह्या कठीण समयी खंबीरपणे आपल्या ज्ञातीबांधवांच्या सोबत आहे. आपण जाणताच की संस्थेचे ब्रीद आहे - **''कोणीही ज्ञातीबांधव उपजिविकेपासून, वैद्यकिय उपचारावाचून व शिक्षणापासून वंचित राहणार नाही या साठी आपली संस्था सर्वतोपरी प्रयत्न करेल''**

सर्व ज्ञातीबांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या माहितीत जर कोणी अशा व्यक्ती अथवा कुटुंब असतील की जे या महामारीच्या प्रादुर्भावामुळे प्रभावित झाले आहेत, संकटामध्ये आहेत अशा गरजूंची माहिती संस्थेकडे कळवावी. जेणेकरून अशा व्यक्ती / कुटुंबांना योग्य ती मदत करता येणे आम्हाला शक्य होईल. संस्था अशा सगळ्या गरजू कुटुंबातील व्यक्तीच्या उपजिविकेची, शिक्षणाची जबाबदारी घेईल. आवश्यक त्या ठिकाणी आपल्या ज्ञातीबाहेरील ब्राह्मण कुटुंबांनाही शक्य तेव्हढी मदत करण्याचाही प्रयत्न करेल.

त्याचसोबत दानशूर ज्ञातीबांधवांनाही आवाहन करण्यात येत आहे की, या यज्ञात आपले योगदान द्यावे, जेणेकरून जास्तीत जास्त गरजूंना मदत करणे संस्थेस शक्य होईल. अधिक माहितीसाठी आपण संस्थेच्या कार्यालयात अथवा कोणत्याही पदाधिकाऱ्यांशी संपर्क करावा ही विनंती. धन्यवाद !


आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



एक उपयुक्त दागिना...!
अदृश्य श्रवणयंत्र
अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध
अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन
मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
Ph.: 2318333, Mob : 9422269394

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक
* अटी लागू

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

**मिहिर कन्स्ट्रक्शन**

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस :** २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल :** ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

## संस्थेस लाख मोलाची देणगी



मूळचे नाशिकचे पण सध्या दुबईस्थित असलेले सौ. प्रिया व श्री. श्रीराम दाते यांनी आपल्या आई **कै. श्रीमती कुंदा विश्वनाथ दाते** व वडील **कै. श्री. विश्वनाथ रामचंद्र दाते,** यांच्या स्मरणार्थ गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी संस्थेस एक लाख रुपयांची देणगी दिली आहे. नुकतेच त्यांच्या आईचे निधन झाले आहे.

त्यांचे वडील महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीत कार्यरत होते. सामाजिक कामासोबतच त्यांना वृक्षारोपणाची प्रचंड आवड होती. तसेच त्यांच्या आईदेखील सामाजिक भावनेतून लहान मुलांचे पाळणाघर चालवत व संस्कारक्षम पिढी घडवण्यावर त्यांचा भर आहे. आपल्या आईवडिलांचा सामाजिक कार्याचा वारसा जतन करताना, **''आपल्या ज्ञातीतील गरजूंच्या शिक्षणासाठी आपल्यातीलच एकाने केलेले हे कर्तव्य''** अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करत त्यांनी ही देणगी संस्थेस दिली आहे.

संस्थेच्या वतीने दाते कुटुंबियांचे शतशः आभार. त्यांनी दिलेल्या देणगीचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करण्यात येईल.

## * देणगी *

**सौ. गीता शारंगपाणी – साठे,** ह्या संस्थेच्या पूर्वीच्या युवक मंडळातील अतिशय सक्रिय कार्यकर्त्या व सध्या पुणे येथे LIC मध्ये वरिष्ठ अधिकारी पदावर कार्यरत असलेल्या गीता यांनी आपल्या आईवडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ हुशार व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दरवर्षी रु. ५,०००/– शैक्षणिक मदत करण्याचे मान्य केले आहे. वैद्यकिय अथवा चार्टर्ड अकौंटन्सीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास प्राधान्य द्यावे व तसा विद्यार्थी / विद्यार्थिनी न मिळाल्यास अन्य कोणत्याही गरजू विद्यार्थ्यास मदत करावी असा मानस त्यांनी व्यक्त केला आहे. संस्थेच्या वतीने त्यांचे शतशः आभार व धन्यवाद !

# कोरोना बद्दल ऑनलाईन बैठक

नुकतीच कोरोनासंसर्ग व त्याच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील सर्व शाखीय ब्राह्मण समाजाच्या पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक संपन्न झाली. ज्या मुद्यांवर एकत्रित काम करण्याची नितांत गरज आहे असे महत्त्वाचे मुद्दे खाली नमूद करत आहे.

१) रक्तदान शिबीर, रक्तदात्यांची विभागावार यादी तयार करणे.

२) गरजू कुटुंबियांसाठी २/३ महिने पुरेल इतकी आर्थिक मदत व शिधा वाटप.

३) निधी संकलन, त्यासाठी समिती, बँक खाते, निधी वाटप व त्यासाठी पारदर्शक व्यवस्था.

४) पीडित कुटुंबियांना मानसिक आधार – घरी जाऊन किंवा फोनवर संपर्क, विचारपूस, मदत, सर्व समाज त्यांच्याबरोबर आहे याची त्यांना जाणीव करून देणे.

५) निराधार / पीडित मुलांचे पालकत्व. त्यांना शैक्षणिक, आर्थिक मदत.

६) भविष्यात गरज लागल्यास आयसोलेशन कॅम्पसाठी पूर्व तयारी.

७) तरूणांचे एकत्रीकरण.

- त्यांच्यासाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करून देणे.
- समाजाच्या कामात त्यांचा सहभाग वाढेल असा प्रयत्न करणे.
- तरूणांची कार्यकर्त्यांची टिम तयार करणे.
- तरूणांसाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबीर घेणे.

८) एम्प्लॉयमेंट सेंटर चालू करणे.

९) ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेशन मशीन बँक बनविणे.

१०) घरगुती व्यावसायिकांच्या मालाला बाजारपेठ / गिऱ्हाईक मिळवून देणे.

११) पुरोहित वर्गाला सर्वतोपरी मदत.

१२) व्हॉट्सअॅप ग्रुपमार्फत सरकारी उपक्रम / मदत याची माहिती समाजातील सर्वांपर्यंत पोचवणे.


१३) संभाव्य कोविड च्या तिसऱ्या लाटेचा सामना करण्यासाठी आधीपासूनच सर्वतोपरी तयारी करणे.

या सभेस आपल्या संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. अविनाश भिडे यांनी संस्थेचे प्रतिनिधित्व केले व सभेस मार्गदर्शन केले.

# "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा..."

संस्थेचे ज्येष्ठ सभासद आणि नाशिकमधील प्रख्यात चहा–कॉफीचे जुने व्यापारी **श्रीनिवास विध्वंस,** यांचे नुकतेच निधन झाले. १९३६ पासून सुरू असलेले नाशिकमधील मेनरोडवरील कन्नड भाषेतील दुकानाची पाटी असलेल्या यांच्या दुकानात ८ ते १० चहा, कॉफीचे उत्तम चवीचे प्रकार आजपावेतो मिळत होते. गिऱ्हाईकांच्या अनेक पिढ्या त्यांच्याकडे बांधलेल्या होत्या.

---




नाशिक रोड येथील संस्थेचे सभासद **श्रीकृष्ण गोडसे** ह्यांचे नुकतेच निधन झाले.

---



आपल्या संस्थेच्या आजीव सभासद सौ. शुभदा सतीश घारपुरे यांचे पती, **श्री. सतीश कृष्णाजी घारपुरे,** यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

---



करन्सी नोट प्रेसमधून निवृत्त झालेले **श्री. मधुकर काशिनाथ वैशंपायन,** यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी आजारपणाने निधन झाले.




आपल्या संस्थेचे कार्यकारिणी सदस्य व पतसंस्थेचे मा. संचालक श्री. नितीन सहस्त्रबुद्धे यांच्या मातोश्री **श्रीमती शालिनी दत्तात्रय सहस्त्रबुद्धे,** यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी ६ फेब्रुवारी, २०२१ रोजी वृद्धापकाळाने नाशिक येथे निधन झाले.

खरं तर त्रिंबकेश्वरमधील अतिशय सधन घैसास घराण्यात वाढलेल्या, लग्नानंतर सहस्त्रबुद्धे कुटुंबियांची बेताचीच परिस्थिती असतानादेखील कोंड्याचा मांडा करण्याचं कसब अंगिकरून, त्यांनी आपल्या मुलांना नितीमत्तेची, स्वाभिमानाची, कर्तबगारीची शिकवण देऊन मोठे केले व परिस्थितीवर कशी मात करायची याचा आदर्श वस्तूपाठ निर्माण केला.


त्यांची चारही मुले आपापल्या क्षेत्रात कर्तबगारीचा ठसा उमटवत आहेत. मृदु स्वभावाच्या, मितभाषी म्हणून त्या आप्तस्वकियांमध्ये सुपरिचित होत्या.

---



आपल्या संस्थेचे आजीव सभासद **श्री. विनय गोपाळराव वाड,** यांचे १४ एप्रिल २०२१ रोजी वयाच्या ६१ व्या वर्षी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. ते मूळचे त्र्यंबकेश्वरचे असून गेली ४० वर्षे नाशिक येथे दुग्ध व्यवसायात होते व सिडको येथे राहत होते. अत्यंत बोलका, मनमिळाऊ आणि उत्साही असा त्यांचा स्वभाव होता.

त्यांच्या पश्चात आई, भाऊ, बहीण, पत्नी, मुलगी आणि जावई असा परिवार आहे.



आपल्या संस्थेचे आजीव सभासद **श्री. विष्णू त्रिंबक खरे,** यांचे नुकतेच अल्पशा आजाराने मुंबई येथे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. मा. यशवंतराव चव्हाण भारताचे संरक्षण मंत्री असताना, श्री. विष्णू खरे यांनी भारतीय लष्करात वायरलेस ऑपरेटर म्हणून काम केले. लष्करातल्या शॉर्ट सर्व्हिस कमिशननंतर त्यांनी सुमारे २० वर्षे मुंबई येथे आयकर विभागात काम केले. अतिशय मनमिळाऊ, हसतमुख व खेळकर स्वभावामुळे ते विशेष लोकप्रिय होते.

---



पुनरूत्थान विद्यापीठाच्या कार्यकर्त्या, विद्याभारतीच्या माजी अखिल भारतीय सह संयोजक, हाडाच्या शिक्षिका व नागपुरातील सरस्वती शिशु मंदिराच्या संस्थापक मुख्याध्यापिका **वंदनाताई फडके** यांचे नाशिकला दिनांक ११ मे २०२१ रोजी दु:खद निधन झालं. त्या ७१ वर्षांच्या होत्या. गत ५० वर्षे शिक्षणाच्या क्षेत्रात ज्ञानदानाचे पवित्र कार्य त्या अविरतपणे करीत होत्या. वंदनाताईंनी शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली होती. ज्ञानी व संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचा वंदनाताईंनी ध्यास घेतला होता व अत्यंत तळमळीने त्यांनी अनेक शैक्षणिक प्रयोग केले आहेत व अनेक शैक्षणिक प्रकल्पही उभे करण्यात ताईंचे मोलाचे योगदान होते.

त्यांच्या अकाली जाण्याने एक आधारवड तर कोसळला आहेच, पण शिक्षण क्षेत्राची फार मोठी व लवकर भरून न येणारी हानी झाली आहे.

पण वंदनाताईंनी जो तेजोमय नंदादीप प्रज्वलित केला आहे तो अनेक कार्यकर्त्यांस पथदर्शी ठरेल. गत १५ वर्षापासून त्या नाशिकमध्ये वास्तव्यास होत्या. चित्तपावन उद्योजक मंचाचे अभय फडके यांच्या त्या मातोश्री होत्या.



संस्थेचे ज्येष्ठ सभासद व नाशिक मधील सामाजिक कार्यकर्ते **श्रीकांत कृष्णाजी शिंत्रे,** यांचे ८१ व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.

नाशिक जिल्ह्यात इंदिरा काँग्रेस स्थापन करणारे ते संस्थापक सदस्य होते. दिवंगत श्रीमती इंदिरा गांधी यांच्याशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. इंदिरा गांधी यांची नाशिकला गाजलेली सभा आयोजित करण्यात त्यांचे मोठे योगदान होते. माजी केंद्रीय मंत्री अर्जुन सिंग, एन. डी. तिवारी, सुरेश कलमाडी, गुरूनाथ कुलकर्णी, मुरली देवरा, प्रियरंजन दास मुन्शी, जयवंतराव टिळक आदी काँग्रेस मधील दिग्गज व माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे निकटवर्ती, नाशिकराव तिरपुडे, कै. बाळासाहेब ठाकरे या सारख्या अनेक राजकीय नेत्यांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. नाशकातील त्यांचे घर एक सामाजिक राजकीय चळवळीचे प्रमुख केंद्र होते. शेवटपर्यंत ते इंदिरा काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते. श्री. सिद्धेश्वर मंडळाच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. नाशिक एज्युकेशन सोसायटीचे संचालक तसेच अखिल मध्यवर्ती ब्राह्मण संघाचे देखील ते पदाधिकारी होते. मनसेचे शॅडो केबिनेट सदस्य व शिंत्रे जिओटेक सोल्युशन अँड सर्विसेसचे पराग शिंत्रे व हर्षद शिंत्रे यांचे ते वडील होते. श्री. श्रीकांत शिंत्रे यांच्या निधनाने सर्वत्र दु:ख व्यक्त करण्यात येत आहे.

---



आपल्या संघाचे आजीव सभासद व नाशिक येथील नामवंत आयुर्वेद चिकित्सक **डॉ. किशोर श्रीराम करमरकर,** वय ६७ वर्षे यांचे शुक्रवार दि. ४ जून रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने राहत्या घरी दु:खद निधन झाले.


डॉ. किशोर करमरकर यांनी पुण्याच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून बी.ए.एम.एस ही पदवी प्राप्त केली होती. त्या नंतर चांदवडकर लेन, शुक्ल गल्ली येथे चिकित्सालय सुरू केले. अल्पावधीतच त्यांनी यशस्वी चिकित्सक म्हणून नावलौकिक मिळवला.

आपले वडील नाशिकमधील नामवंत वैद्यराज कै. अण्णाशास्त्री करमरकर यांचाच वारसा ते समर्थपणे पुढे चालवीत होते. ८० च्या दशकात संस्थेतर्फे चाळीशीनंतरच्या सभासदांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या वैद्यकीय तपासणी शिबीरात त्यांचा मोलाचा वाटा होता. विनामूल्य सेवे बरोबरच शिबिराच्या संपूर्ण आयोजनात त्यांचा सहभाग असायचा.



**सौ. स्वप्ना अजय लिमये (केळकर) व श्री. अजय सूर्यकांत लिमये,** या दाम्पत्याचे नुकतेच कोरोनामुळे निधन झाले. स्वप्ना लिमये ह्या सुरवातीस चित्तपावनच्या युवक मंडळ व आता महिला मंडळाच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. तसेच त्या LIC मध्ये नोकरी करीत होत्या, तर त्यांचे पती अजय हे महाराष्ट्र बँकेत नोकरी करीत होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा आहे. दोघांच्या निधनाने अतिशय हळहळ व्यक्त होत आहे.

---



आपल्या संस्थेचे सभासद **श्री. प्रसन्न गोडबोले व सौ. स्वाती गोडबोले,** या दाम्पत्याचे कोरोनामुळे दुःखद निधन झाले. अतिशय शांत व मनमिळाऊ स्वभावामुळे मित्रांमध्ये ते विशेष प्रिय होते. गोडबोले कुटुंबियांच्या दुःखात संस्था सहभागी आहे.

---

**श्रीमती मालती प्रभाकर घारपुरे** यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. १६/०४/२०२१ रोजी दुःखद निधन झाले. श्रीमती मालती प्रभाकर घारपुरे ह्या समाज कल्याण विभाग येथून सेवानिवृत्त झाल्या होत्या.


नाशिक एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्यवाह व पेठे विद्यालय नाशिकचे माजी ज्येष्ठ शिक्षक कै. प्रभाकर बाबूराव घारपुरे सर यांच्या त्या पत्नी होत्या.

नाशिकमधील वकील व नाशिक एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी मंडळ सदस्य ॲड. जयदीप वैशंपायन यांच्या त्या आजी होत्या.




आपल्या संस्थेचे सभासद **भास्कर रामचंद्र करंदीकर व त्यांचे बंधू गजानन रामचंद्र करंदीकर** यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.


---



माजी सैनिक **श्री. वैजनाथ लक्ष्मण जोशी,** वय ७६ यांना दिनांक ११/०५/२०२१ रोजी देवाज्ञा झाली. त्यांनी २००८ साली १९० दिवसात पायी नर्मदा परिक्रमा केली होती.

त्यांच्या पश्चात २ मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

---



आपल्या संस्थेचे आजीव सभासद **श्री. दिवाकर गणेश शारंगपाणी** ह्यांचे ८२ व्या वर्षी ठाणे येथे अल्पशा आजाराने देहावसान झाले. दि. १३ मे २०२१ रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते नाशिक येथे पोस्टल स्टोर डेपोतल्या प्रदीर्घ सेवेमधून निवृत्त झाले होते. अनेक वर्षे त्यांनी भारतीय मजदूर संघाचे डाक विभागाचे अध्यक्ष म्हणून काम बघितले होते. जुन्या काळातील उत्तम कुस्ती व कबड्डीपटू म्हणून ते नाशिककरांना ज्ञात होते. अनेक वर्षे त्यांनी गुलालवाडी व्यायामशाळा व ओकाच्या तालमीचे प्रतिनिधित्व केले होते. एरव्हीही खंबीर व करारी असणारे अण्णा गेल्या काही वर्षात पत्नीच्या निधनाने काहीसे हळवे व अंतर्मुख झाले होते. शारंगपाणी कुटुंबियांचे कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबियांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी नेहमी स्वतःच्या इच्छा आकांक्षांचा त्याग केला होता व सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याकडे नेहमी त्यांचा कल असायचा. गीता व राजेश या त्यांच्या मुलांच्या पाठीशी नेहमीच ते ढाल बनून असायचे व त्यांना प्रोत्साहन द्यायचे. बी. वाय. के. कॉलेज चे माजी प्राचार्य रत्नाकर शारंगपाणी यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

## "सर्व दिवंगतांस संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली"

# सुखांत जीवनाचा

**लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक**

त्यामध्ये सन २००५ साली लॉ कमिशनच्या १९६ व्या रिपोर्टमध्ये शिफारस केलेल्या व विचारार्थ ठेवलेल्या 'द मेडिकल ट्रिटमेंट ऑफ टर्मिनली इल् पेशंटस् (प्रोटेक्शन ऑफ पेशंटस् ॲण्ड मेडिकल प्रॅक्टिशनर्स) बिल २००६ मध्ये आणखी काही सुधारणा सुचविल्या व त्या सुधारणांसह या संबंधीचा कायदा पारित व्हावा अशी शिफारस केंद्र सरकारला केली.

परंतु दुर्दैवाने त्या बाबतचा विचार आजपर्यंत झालेला नाही व असा, अत्यंत गरज असलेला, कायदा अजूनही केंद्र सरकारने पारित केलेला नाही.

**२०११ मधील नर्स अरूणा शानबागच्या केसमधील निकालानंतर ९ मार्च २०१८ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या संविधानिक खंड पीठाने कॉमन कॉज विरूद्ध युनियन ऑफ इंडिया रिटपिटीशन नं. २१५ / २००५ मध्ये** Passive Euthanasia **संदर्भात, जोपर्यंत केंद्र सरकार त्या संदर्भातील कायदा पारित करीत नाही, तोपर्यंतचा कायदा त्यामधील काही मार्गदर्शक तत्वे, सूचना व संरक्षिक बाबींसह पारित केला व त्यामध्ये 'लिव्हिंग विल' ही कन्सेप्ट सांगितली. हा निकाल देतांना सर्वोच्च न्यायाधिशांनी मृत्यूशय्येवर खितपत पडलेल्या रूग्णांचा, त्यांच्या नातेवाईकांच्या मानसिकतेचा, त्यांची आर्थिक परिस्थिती, रूग्णाचे जगण्याचे हक्क, त्याच्या मृत्यूपर्यंत सन्मानाने जगण्याच्या हक्कांचा सखोल व सांगोपांग विचार केला आहे. जोपर्यंत केंद्र सरकार** Passive Euthanasia **निष्क्रीय इच्छामरणाबाबतचा कायदा पारित करीत नाही, तोपर्यंत निष्क्रीय इच्छामरणाला कोणत्या परिस्थितीत मान्यता देता येईल व त्यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे व कोणत्या गोष्टी व कशी कार्यवाही केली पाहिजे त्याबाबतची मार्गदर्शक तत्वे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने घालून देतांनाच 'लिव्हिंग विल' (जिवंतपणीची इच्छा किंवा जिवंतपणीच अमलात आणावयाची इच्छा) कसे असावे या संदर्भातील सर्व नियम, अटी, शर्ती व मार्गदर्शक तत्वे घालून दिल्या आहेत.**

अशा प्रकारचे लिव्हिंग विल कोण करू शकतो, कोणत्या परिस्थितीत करू शकतो, ते लिखित असावे की नसावे, रुग्णाने ते स्वेइच्छेने, कोणाच्याही दडपणाला बळी न पडता, त्याचे सर्व परिणाम समजून उमजून घेऊन ते केलेले आहे की नाही या बाबतचे फार बारकाईचे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या न्याय निर्णयात दिलेले आहेत. जिवंतपणीच अमलात आणावयाच्या इच्छा पत्रात (लिव्हिंग विल) मध्ये नेमक्या कोणत्या गोष्टींचा समावेश असावा, ते कोणासमोर केलेले असावे, त्याच्या किती प्रती असाव्यात, ते कधी व कोणत्या परिस्थितीत अमलात आणावे, ते अमलात आणताना कोणत्या गोष्टी बघितल्या पाहिजेत, त्यासाठी कोणाची परवानगी घ्यावी लागेल, ते कोणाच्या देखरेखीखाली अमलात आणावे ही व इतर अशी अनेक मार्गदर्शक तत्वे सर्वोच्च न्यायालयाने या न्याय निर्णयात घालून दिलेली आहेत.

त्यामध्ये वैद्यकिय व्यवसायिकांच्या संरक्षणाबरोबरच प्रत्यक्ष रूग्णाच्या संरक्षणाचाही विचार केलेला आहे. रूग्णाच्या असहायतेचा गैरफायदा घेण्याची काही लोकांची प्रवृत्ती, रूग्ण व त्याचे नातेवाईक, आप्तस्वकीय यांची मानसिकता, काही वेळा संपत्ती व मालमत्तेच्या लालसेपोटी केली जाणारी बेकायदेशीर कृत्ये या व अशा अनेक गोष्टींचा अतिशय बारकाईने या न्यायनिवाड्यात विचार केलेला आहे.

अतिशय गंभीर आजार झालेला रूग्ण, तो सक्षमपणे विचार करण्याच्या परिस्थितीत असतानाच त्या आजाराचे स्वरूप बळावल्यानंतर भविष्यात, जेव्हा तो आजार आता कधीही बरा होणार नाही अशा टप्प्यावर आल्यावर किंवा जेव्हा रूग्ण त्या आजारामुळे स्वत:ची जाणीव हरवून बसेल त्यावेळी त्या रूग्णावर, म्हणजे स्वत:वर होत असलेली औषध उपाय योजना थांबवावी, त्याचा स्वत:चा मृत्यू लांबवू नये, (ऊ पीं ठशलर्शीीरींश उछठ) जेव्हा केव्हा त्याला नैसर्गिक मृत्यू येईल तेव्हा तो येऊ दे अशा आशयाची इच्छा या लिव्हिंग विल मध्ये करून ठेवलेली असते. प्रत्येक माणसाला त्याचे जीवन जगण्याची स्वायत्तता (खपवर्ळींळवींरश्र औींपेी) आहे हे तत्व या मागे आहे.

**(क्रमश:)**

## ✻ देणगी ✻

१) सौ. अंजली प्रकाश गाडगीळ, नाशिक. **श्रीमती इंदुमती गाडगीळ,** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ **वैद्यकिय मदतीसाठी ३,०००/-**

२) सौ. अकल्पिता अनिरूद्ध अभ्यंकर, नाशिक. **कै. सौ. मंगला मधुकर वैशंपायन,** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ **शिधा वाटप योजनेसाठी १०,०००/-**

३) सौ. विद्या मराठे, अमेरिका. आई **जयश्री शंतनु साठे,** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ **वैद्यकिय मदतीसाठी २०,०००/-**

४) श्रीमती सुषमा श्रीकृष्ण गोडसे, नाशिक. **कै. श्रीकृष्ण वासुदेव गोडसे,** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ **५,०००/-**

५) श्री. श्रीराम दाते, दुबई. यांच्याकडून **आई वडिलांचे नांवे, शैक्षणिक उपक्रमासाठी १,००,०२१/-**

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ४७४ | **प्रथमेश अतुल भिडे**<br>२०२, स्पर्श हाइटस, आयनॉक्स मल्टिप्लेक्स समोर, अशोका टायर्स शेजारी, नाशिक-पुणे रोड, नाशिक - ४२२ ०११. मो.: ९४२०८४९७५८ | २२/०१/१९९२ | नित्युंदन | ५'.६'' | BE (ENTC) | २५,०००/- |
| ४७५ | **श्रीकांत धनंजय फडके**<br>फ्लॅट नं. ११ व १२, श्री पूजा अपार्टमेंट, पोस्ट ऑफिसच्या वरती, उद्यान कॉलनी, इंदिरानगर, नाशिक - ४२२ ००९. फोन : ०२५३-४०३८४९८ मो.: ९४०४२१०५६२ | २८/११/१९९२ | अत्री | ५'.८.५'' | BE IT + C dac | ४२,०००/- |
| ४७६ | **प्रतिक धनंजय गोखले**<br>१४७५, पेंडसे सदन, पगडबंद लेन, नाशिक - ४२२ ००१. फोन : ०२५३-२५०४५१८ मो.: ९५१८३७८५७७ | १९/०९/१९९० | काश्यप | ५'.८'' | बी.कॉम लॉजेस्टिक डिप्लोमा | १६,०००/- |
| ४७७ | **अभिजित सुमंत दीक्षित**<br>फ्लॅट नं. ९, गुरूकुल अपार्टमेंट, के. के. वाघ कॉलेजच्या मागे, दुर्गानगर, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३. मो.: ९२८४७५६०३३ / ७७०९५४०४९८ (आई) | १८/०९/१९९१ | कृष्ण अत्रेय | ५'.७'' | BE Product | १८,३००/- |
| ४७८ | **राहुल अजय जोशी**<br>रूम. नं. २०३, उपेंद्रनंद, सरस्वती नगर, ६ व्या स्किम समोर, अंबड लिंक रोड, नाशिक - ४२२ ०१०. मो.: ९५६१८३७८४३ / ९७६६१०३५६७ | १३/०९/१९९१ | शांडिल्य | ५'.६'' | B.Com | २०,०००/- |
| ४७९ | **रोहित नारायण आठवले**<br>९, सत्यदर्शन अपार्टमेंट, सुचितानगर, नाशिक - ४२२ ००९. फोन : ०२५३-२५९२४७४. मो.: ९८२२८०८९६६ | २१/०१/१९९२ | अत्री | ५'.५'' | BE (Etec) | ३५,०००/- |
| १ | **धनंजय नरहरी सोमण**<br>१०१, गणेश दर्शन, खेमागल्ली, अग्यारी लेन, जांभळी नाका, जि. ठाणे. मो.: ९९३०६७१४५६ / ९९३०६०५११६५ | १६/०७/१९८९ | शांडिल्य | ५'.६'' | १२ वी पास (पौरोहित्य) | ३०,००० ते ४०,०००/- |
| २ | **गौरव नरहरी सोमण**<br>मु. करंजाळी, पो. फणसु, ता. दापोली, जि. रत्नागिरी. मो.: ०८३९०३१३१०४ / ९२७००३००५७ | २६/०४/१९९२ | शांडिल्य | ५'.१०'' | Mechanical Engg. Diploma | १५,००० ते २०,०००/- |
| ३ | **नरेंद्र श्रीकांत वझे**<br>८९, टिळकपथ, रामबाग, इंदौर, मध्यप्रदेश. मो. ७०७९१८०१११ | १४/१०/१९८८ | गार्ग्य | ५'.७'' | MBA Marketing | ३ ते ५ लाख |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २१५ | **गौरी श्रीपाद डोंगरे**<br>४/६, वैष्णव संकुल, लॅम रोड, दत्त पेट्रोल पंप समोर, महाराजा स्टॉप, नाशिकरोड - ४२२ १०१.<br>मो.: ७८७५५४८२४५ | ०५/०९/१९९२ | शांडिल्य | ५' | M.A. English M.A. Psychology B.Ed. | - |
| २१७ | **मानसी नंदकुमार बाळ**<br>सी-९, तिरुमला आस्था, चेतना नगर, नाशिक - ४२२ ०१०.<br>मो.: ९८५०३१५३९४ | २१/०४/१९९५ | बाभ्रव्य | ५'.३'' | बी.कॉम. | - |
| २१८ | **डॉ. भाग्यश्री महेश गोखले**<br>ए-१६, दि. रेनिसन्स अपार्टमेंट, दामोदर फडके नगर, गोविंद नगर, नाशिक - ४२२ ००९.<br>मो.: ७२७६५२६९३९ | २१/०७/१९९४ | काश्यप | ५'.४'' | डॉक्टर | ३५,०००/- |
| २१९ | **ऐश्वर्या सुशांत करमरकर**<br>दत्त अपार्टमेंट, बालिकाश्रमरोड, सावेडी, अहमदनगर - ४१४ ००३.<br>मो.: ८४२१७४३०२५ | २६/१०/१९९६ | काश्यप | ५'.६'' | एम.एस्सी | - |
| २२० | **शिवानी सदानंद लोंढे**<br>फ्लॅट नं. १०, बिल्डींग नं. १३, नरसिंह नगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.<br>फोन : ०२५३-२३४०५५०. मो.: ९९७०६२३१७५ | ०९/०१/१९९७ | गार्ग्य | ५'.७'' | M.Com CA (Computer) | २०,०००/- |
| २२१ | **ऋतुजा अविनाश लिमये**<br>४, मनोरमा हौसिंग सोसायटी, स्वामी समर्थ वास्तु संकुल, तरण तलावाजवळ, घाडगे मळा, नाशिकरोड-१०१.<br>मो.: ९९२२०५०३९५ / ९८८११६७५३५ | ०८/०९/१९९४ | कपी | ५'.३'' | BCA (Computer) | ७,०००/- |
| २२२ | **मृण्मयी संकेत कुलकर्णी**<br>घर. नं. १२३५, गणेश टेक, भागवत शेजारी, नाशिक - ४२२ ००१.<br>मो.: ९३७१२३६२९० | ०४/०१/१९९४ | शौवक | ५'.४'' | B.Com | - |
| २२३ | **कामिनी प्रमोद काळे**<br>फ्लॅट नं. ९-बी, सातभाई नगर, जेलरोड, नाशिकरोड.<br>मो.: ८२०८०१४१०५ / ८०८०७४३६१३.<br>(घटस्फोटीत व १ मुलगा आहे.) | १६/११/१९८९ | भारद्वाज | ५'.२'' | फॅशन डिझाइन | २०,०००/- |

# दिपक गद्रे... एक प्रेरणादायी यशोगाथा

हा अंक वाचताना श्रद्धांजलीच्या एव्हढ्या बातम्या वाचून कदाचित आपल्या मनात कोलाहाल माजला असेल. कोरोनाच्या जागतिक प्रादुर्भावामुळे सध्या सर्वत्र परिस्थितीच तशी आहे. पण थोडासा साकल्याने विचार केला तर लक्षात येईल की दिवंगतांमध्ये अनेक जण हे कृतार्थतेने परिपूर्ण जीवन जगून निजधामाला गेले आहेत. तर काही जण हे अकाली कर्तबगारीच्या मध्यावर, आपली स्वप्ने अर्धवट सोडून अर्ध्यावरती डाव मोडून निष्ठूर काळाला शरणागत झाली आहेत.

असे असले तरी जगाच्या पाठीवर अंध:कार नष्ट करणारा, जीवन प्रकाशमय करणारा सूर्य मावळलेला नाहिये. अनेक घटनांमधून आशेची किरणे उद्दीपित होत आहेत. देवदूत त्यांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत, शास्त्रज्ञ, वैज्ञानिक दिवसरात्र मानवतेच्या सेवेसाठी झटत आहेत. दानशूर व नि:स्वार्थी सेवाव्रती गरजूंच्या मदतीसाठी पुढे येत आहेत. परिस्थितीशी आणि कठीण प्रसंगावर मात करून धीरोदात्त पणे आपल्या आयुष्याची मार्गक्रमणा करत यशाची शिखरे गाठत आहेत.

**आज आपण अशाच एका ज्ञातीबांधवांची प्रेरणादायी यशोगाथा बघणार आहोत –**

भारतात नॉन–व्हेजला डिमांड किती जास्त आहे हे काही सांगायला नको. त्यातही आपली लोकं आवडीनिवडीत जास्त माहीर. नॉन–व्हेजमध्ये मासे हा पदार्थ खासंच. सुरमई, पापलेट, बोंबील, कोळंबी असे कितीतरी प्रकार सांगता येतील जे रोजच्या रोज हॉटेलमध्ये खाद्य शौकिन माणसं फस्त करत असतात. आता हे भारतातलं सोडा, जरा जगाचा विचार करू. परदेशात सुद्धा बक्कळ मासे खाल्ले जातात. पण काही निवडक देशांमध्ये जे मासे पुरवले जातात, ते आपला मराठी माणूस पोहोचवतो. आजची यशोगाथा सुद्धा खास आहे. भारतातल्या प्लॅस्टिक कचऱ्याचा सदुपयोग करून त्यातून नफा मिळवणं असो किंवा परदेशात मासे पाठवून परदेशात ऑफिस असो हे सगळे भीमपराक्रम एका मराठी माणसाने केले आहेत यावर तुमचा विश्वास बसणार नाही.

**''रत्नागिरीच्या दिपक गद्रेंनी आपला व्यवसाय परदेशात पोहोचवला ते कौतुकास्पद आहे. एम.कॉम. पर्यंतचे शिक्षण घेऊन त्यांनी व्यवसाय करण्याच्या उद्देशाने नवीन सुरुवात करण्याचं ठरवलं. निरीक्षण आणि टाकाऊ पासून टिकाऊचा फॉर्म्युला लक्षात ठेवत त्यांनी जागतिक बाजारपेठेत आपलं मार्केट निर्माण केलं.''**

सुरुवातीच्या काळात कोळी लोकं जाळ्यात अडकलेले छोटे मासे, कुणी खात नाहीत म्हणून ते, तिथेच टाकून जायचे. दिपक गद्रे यांनी मात्र त्या माशांवर प्रक्रिया करून ते फ्रोझन मासे म्हणून शीतगृहात ठेवून विकण्यास सुरवात केली. हळूहळू व्यवसाय वाढत गेला. ओळखी वाढत वाढत जाऊन त्या थेट परदेशापर्यंत गेल्या.

वाढता व्यवसाय बघून त्यांनी १९७८ साली रत्नागिरीमध्ये सी फूड फॅक्टरी सुरू केली. या फॅक्टरीमध्ये प्रक्रिया केलेले फ्रोझन मासे त्यात कोळंबी, स्क्विड मासा अशा अनेक प्रकारच्या माशांच्या प्रजाती ठेवल्या.

**एकदा ते जपानच्या दौऱ्यावर असताना त्यांनी तिथे सुरमी प्लांट बघितला. त्याचा उपयोग आपल्याला व्यवसाय वाढवण्यासाठी होऊ शकतो असं लक्षात आल्यावर, त्यांनी भारतात आल्यावर १९९४ साली भारतातला पहिला सुरमी प्लांट उभा केला.**

जसा कंपनीचा उत्कर्ष होऊ लागला तेव्हा दिपक गद्रेंनी अत्याधुनिक मॅन्युफॅक्चरिंग यंत्रे मागवून त्यामार्फत प्रक्रिया सुरू केली. दूरच्या देशात त्यांना मासे निर्यात करता येऊ लागले. त्यामुळे त्यांनी आपल्या मालाचा दर्जा कधी घसरू दिला नाही. १९९९ च्या सुमारास गद्रे मरिन इंडस्ट्री ही चांगली गुणवत्ता आणि विश्वासाचा ब्रँड म्हणून उदयास आली.

**साऊथ कोरिया पासून ते जपान, मलेशिया आणि तैवान ते ऑस्ट्रेलिया अशा मोठ्या देशांमध्ये गद्रे इंडस्ट्री आपला माल पाठवू लागली. २००४ साली अर्जुन गद्रे हे गद्रे मरिनचे सी.ई.ओ. झाले. अर्जुन गद्रे यांनी सुरमी प्रॉडक्टची वेगळी उत्पादने आणि फ्रोजन प्रॉडक्टस्, जी खाण्यासाठी ग्राहकांना २–३ मिनिटात तयार होऊ शकतात अशी विभागणी केली.**

आज घडीला गद्रे मरिन ही जगातली ३ री सुरमी प्लांट असलेली कंपनी आहे. रत्नागिरी, चोरवाड, गुजरात आणि ब्रम्हावर, कर्नाटक अशा ठिकाणी गद्रे मरिनचे तीन प्लांट्स् आहेत. आपल्या उत्कृष्ठतेच्या जोरावर आणि चांगल्या सर्व्हिसमुळे आज गद्रे इंडस्ट्री जगभरात प्रसिद्ध आहे.

आता गद्रे मरिनच लक्ष्य हे भारतीय मार्केट आहे. मॉडर्न भारतीयांच्या जिभेची चव ओळखून नवीन पाऊल गद्रे मरीन टाकत आहे. जागतिक पातळीवर सुरमी प्लांट हा आपलाच असावा असा होरा त्यांचा आहे. नवीन टेक्नोलॉजी आणि चांगल्या गुणवत्तेच्या जोरावर उरलेल्या सुरल्या सगळ्या देशांमध्ये आपलं प्रोडक्ट ते पोहचवत आहेत.

रत्नागिरी मध्ये स्थित असलेल्या फॅक्टरी मध्ये फिश ऑइल, सुरमी प्लांट, पॅकिंग ऑफ फ्रोजन फिश, क्रॅब स्टिक्स, कोल्ड स्टोरेज फॅसिलिटी असे अनेक उद्योग चालतात. ग्राहकांना ताजे आणि स्वच्छ मासे कसे पुरवता येतील याकडे ही मरीन इंडस्ट्री पूर्ण भर देते.

**फक्त २८ रुपये लिटर डिझेलची निर्मिती**

**गेल्या दोन वर्षांपूर्वी रत्नागिरी एमआयडीसी येथे प्लास्टिक पायरोलिसीस म्हणजे प्लास्टिकवर प्रक्रिया करून डिझेल बनवण्याचा प्रकल्प दीपक गद्रे यांनी यशस्वी केला आहे. एक हजार किलो प्लास्टिकपासून ८०० लिटर डिझेल बनवले जाते. त्यातून तयार होणाऱ्या १० टक्के कार्बन व १० टक्के वायूचा उपयोग पुन्हा डिझेलनिर्मितीसाठी वापरला जातो. डिझेलचा उपयोग कंपनीतील पॉवर जनरेटरसाठी केला जातो. त्यामुळे या प्रकल्पात कोणतीही गोष्ट वाया जात नाही. जागतिक दर्जाचे डिझेल बनवणारा हा कोकणातील पहिलाच प्रकल्प आहे.**

**सध्या उत्तम प्रतीचे डिझेल फक्त २८ रुपयांत मिळते. सध्या याचा वापर कंपनीतील पॉवर जनरेटर चालविण्यासाठी करतो. भविष्यात वाहनातही हे डिझेल वापरण्याचा मानस आहे अस दीपक गद्रे सांगतात.**

आता थोडंसं मागे जाऊया. १९७० च्या सुमारास दीपक गद्रे हे गोदीमध्ये डिझेल पुरवायचे. मासेमारी आणि त्या व्यवसायांमध्ये प्लॅस्टिकचा प्रचंड वापर व्हायचा. पर्यावरणाच्या दृष्टीने तो घातक होता. सुरवातीला या प्लॅस्टिकच्या पिशव्या आणि बाजारातल्या इतर पिशव्या ८ रुपय किलोने गोळा करून ते या वापरलेल्या पिशव्यांमधून डिझेल निर्मितीसाठी द्यायचे आणि यातून ते दिवसाला ८०० लिटर डिझेल मिळवायचे. जागतिक दर्जाचं हे डिझेल ते आपल्या शीतगृहांमध्ये वापरतात.

प्रोडक्टपासून ते मसाल्यापर्यंत सगळ्यात गद्रे मरिनने आपले हात पसरलेले आहेत. लोकांकडून वाढती मागणी हेच या कंपनीचं लोकप्रिय असण्याचं लक्षण आहे.

गद्रे मरीनचे सीईओ अर्जुन गद्रे हे आंत्रप्रेन्युअर म्हणूनही परिचित आहेत. रत्नागिरीमध्ये अनेक लोकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. गद्रे यांचं एक ऑफिस हे सिंगापूरला आहे आणि तिथे प्रमुख माणूस हा अमेरिकेचा आहे. न्यूयॉर्कच्या ऑफिसचा प्रमुख माणूस मेक्सिकन आहे. साधा व्यवसाय कसा विस्तारू शकतो याच उदाहरण म्हणजे गद्रे मरिन.

रात्री अपरात्री जाणाऱ्या महिलांसाठी विश्रामगृहे, लहान बाळांसाठी पाळणाघरे असे अनेक स्तुत्य उपक्रम देखील गद्रे मरीन राबवते. जागतिक आणि देशांतर्गत पातळीवरसुद्धा गद्रे मरीनला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

इतक्या उच्च पातळीवर काम करत असताना व्यवसायाव्यतिरिक्त कुठेही आपल्या नावाचा ते प्रचार करत नाहीत. बऱ्याच लोकांना तर हेही माहिती नसतं कि फ्रोजन फिश हे गद्रे मरीन मधून आलेले असतात. प्रसिद्धीचा गाजावाजा न करता कामावर फोकस असणारे गद्रे मरीन्स हे आदर्श उदाहरण आहे.

**दीपक गद्रे यांच्या कर्तृत्वाला आणि कार्याला आमचा मानाचा मुजरा. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेकडून हार्दिक शुभेच्छा.**




**– सौजन्य : बोल भिडू**

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

# सुवर्ण संचय समृद्धी योजना

बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा. लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

**आमचे ध्येय... "तुमची धनसमृद्धी"**

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

**विचार कसला करताय, येताय ना मग !**

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र' च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.